**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०५**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२५/०६/२०१२

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(४) नुसार** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.०५ शुक्रवार दि.२९/०६/२०१२ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह कार्यालय येथे बोलावण्यांत आली आहे. सदर सभे मध्ये खालील प्रमाणे कामकाज होईल.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या मान्यतेने

**(विषय सुची)**
**शुक्रवार दिनांक-२९ /०६/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| २९ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समिती सभेचे निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठ्या टाकून ठरविणे. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक- २९ | शुक्रवार दिनांक २९/६/२०१२ |
| ठराव क्रमांक- २९ | शुक्रवार दिनांक २९/६/२०१२ |

**प्रस्तावाचा विषय :-**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४)नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समिती सभेचे निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे.

--**--

**<u>ठराव :-</u>**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समिती सभेचे निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे कामी बोलावण्यांत आल्या प्रमाणे मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०५ शुक्रवार दिनांक २९/०६/२०१२रोजी दुपारी १.००वाजता अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत,औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह येथे भरली असता सदर सभेमध्ये खालील प्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नाव | |
|---|---|---|
| १ | मा.सौ. राठोड अनिता राजेंद्र | सभापती स्थायी समिती |
| २ | मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाऊ | सदस्य |
| ३ | मा.सौ. मिसाळ मुक्ता गोपीनाथ | सदस्या |
| ४ | मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज | सदस्या |
| ५ | मा.सौ.गायकवाड निलीमा वसंत | सदस्या |
| ६ | मा.श्री. कोतकर सुनिलकुमार सर्जेराव | सदस्य |
| ७ | मा.सौ. लोंढे मोहिनी संजय | सदस्या |
| ८ | मा.श्री. सप्रे दत्तात्रय नामदेव | सदस्य |
| ९ | मा.श्री. खान समद वहाब | सदस्य |
| १० | मा.सौ. शिंदे रजनी अरविंद | सदस्या |
| ११ | मा.सौ.उडाणशिवे गिरजाबाई भाऊसाहेब | सदस्या |
| १२ | मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव | सदस्य |
| | **त्याचप्रमाणे** | |
| १ | मा.श्री. जगताप नितीन विलास | सदस्य |
| २ | मा.श्री. डागवाले किशोर आसाराम | सदस्य |
| ३ | मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाऊ | सदस्य |
| ४ | मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक | सदस्य |

हे सन्माननीय सदस्य अनुपस्थित होते.

उपरोक्त प्रमाणे सभेस उपस्थित असलेल्या मा.सदस्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समितीचे दिनांक १/७/२०१२ रोजी दूपारी निवृत्त होणारे आठ सदस्य ठरविणे कामी आजची सभा बोलावण्यांत आलेली आहे. मा. शासनाचे राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या मा.सदस्यांच्या नांवाप्रमाणे मा.स्थायी समिती सदस्यांच्या नांवाच्या चिठ्ठया तयार करून त्या सभेमध्ये वाचून दाखविण्यांत येतील व त्या नावांच्या चिठ्ठयांच्या सारख्या घडया करण्यांत येवुन त्या चिठ्ठया एका पारदर्शक प्लॅस्टिकचे बरणीमध्ये टाकून, बरणीचे झाकण लाऊन, चांगल्या प्रकारे हलविण्यांत येवुन एकत्र करण्यांत येतील व कुमार विशाल जालिंदर अडागळे , आहिल्याबाई होळकर प्राथमिक शाळा सर्जेपुरा, अ.नगर येथील शाळेमध्ये इयत्ता तिसरीचे वर्गामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्या कडून बरणी मधील एक चिठ्ठी काढून त्यावरील नांवे सभेस वाचून दाखविण्यांत येईल व पुन्हा बरणी बंद करून त्यामधील चिठ्ठया चांगल्या प्रकारे हलवून एकत्र करण्यात येतील व पुन्हा चिठ्ठी काढण्यात येईल. याप्रमाणे एकूण आठ चिठ्ठया काढून त्या चिठ्ठया वरील नांवे सभेमध्ये वाचून दाखविण्यांत येतील वाचून दाखविलेल्या चिठ्ठया वरीलनांवाप्रमाणे मा.स्थायी समितीचे ८(आठ) सदस्य नियमानुसार दिनांक १ जुलै २०१२ रोजी दुपारी मा.स्थायी समितीचे सदस्य म्हणून निवृत्त होतील व राहिलेले सदस्य पुढिल वर्षा पर्यत मा.स्थायी समितीचे सदस्य म्हणून कार्यरत रहातील याप्रमाणे सभेचा कार्यवाही असेल याप्रमाणे सभेत सांगितले.

सभेस उपस्थित असलेल्या मा.सदस्यांना निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे कामी मा.स्थायी समितीचे सर्व सोळा सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठया वाचून दाखविण्यांत आल्या व चिठ्ठयांच्या सारख्या घडया करण्यांत येवुन त्या एका पारदर्शक प्लॅस्टिकच्या बरणी मध्ये मोजून टाकण्यांत येवुन त्या चांगल्या प्रकारे मिसळण्यांत आल्या व कुमार विशाल जालिंदर अडागळे या विद्यार्थ्यास बरणी मध्ये घडया करून टाकलेल्या चांगल्या प्रकारे मिसळलेल्या चिठ्ठयापैकी एक चिठ्ठी काढणेस सांगितले त्याने काढलेली चिठ्ठी मा.सभेस वाचून दाखविण्यांत आली. बरणी बंद करून पुन्हा बरणी हलवून चिठ्ठया मिसळण्यांत आल्या व कुमार विशाल जालिंदर अडागळे यांस बरणी मधून चिठ्ठी काढणेस सांगण्यात आले. याप्रमाणे एकूण ८ (आठ) चिठ्ठया काढून त्या मा.सभेस वाचून दाखविण्यांत आल्या त्या चिठ्ठयामधील नांवे पुढिल प्रमाणे.

| अ.नं. | सदस्यांचे नांवे |
|---|---|
| १ | कावरे दत्तात्रय हरिभाऊ |
| २ | राठोड अनिता राजेंद्र |
| ३ | भोसले गणेश पुंडलिक |
| ४ | लोंढे सुभाष सोपानराव |
| ५ | शिंदे रजनी अरविंद |
| ६ | सप्रे दत्तात्रय नामदेव |
| ७ | मिसाळ मुक्ता गोपीनाथ |
| ८ | गंधे सुमन मोहनीराज |

वरीलप्रमाणे नावे वाचून दाखविण्यांत आल्या प्रमाणे मा. सदस्य दिनांक १/०७/२०१२ रोजी दुपारी निवृत्त होतील. असे मा.सभापती यांनी सांगितले.

तद्नंतर बरणीमध्ये राहिलेल्या चिठ्ठयावरील सदस्यांची नांवे सभेस वाचून दाखविण्यांत आली त्यामधील सदस्यांची नांवे पुढिल प्रमाणे

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांवे** |
|---|---|
| १ | सातपुते दिलीप नानाभाऊ |
| २ | जगताप नितीन विलास |
| ३ | डागवाले किशोर आसाराम |
| ४ | गायकवाड निलीमा वसंत |
| ५ | कोतकर सुनिलकुमार सर्जेराव |
| ६ | लोंढे मोहिनी संजय |
| ७ | खान समद वहाब |
| ८ | उडाणशिवे गिरजाबाई भाऊसाहेब |

उपरोक्त वाचून दाखविल्या प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य हे पुढिल वर्षाकरिता स्थायी समिती सदस्य म्हणून कार्यरत राहतील असे जाहिर करण्यांत आले.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका